जिल्हाधिकारी लातूर यांचे कार्यालय
महसुल शाखा

---

**टंचाईग्रस्त क्षेत्रामध्ये मदतीबाबत टंचाई कक्षाची स्थापना व अनुषंगीक कामे करणेबाबत.**

**जिल्हाधिकारी, लातूर यांचे कार्यालय**
**(महसूल विभाग)**
**क्रं.2014/महसूल/टंचाई/कावि-1343 सिआर-7**
**दि. 28.11.2014**

**वाचा -** 1. शासन निर्णय पा.पु.व स्व. वि.क्र टंचाई 1099/प्रक्र 12/पापं 14 दिनांक 03.02.1999
2. मा.शासन महसूल व वन विभाग (मदत व पुनर्वसण) यांचे परिपत्रक क्रं.एस.सी.वाय.2013/ प्रक्र 173/म-7 दिनांक 3 एप्रिल 2013.
3. मा. महसुल मंत्री, महाराष्ट्र राज्य, यांच्या अध्यक्षतेखाली दि. 22.11.2014 रोजी च्या बैठकीतील निर्देश.
4. मा. शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र एससीवाय / 2014/ प्रक्र 207 म-7 दि. 25.11.2014

## परिपत्रक -

लातूर जिल्हयामध्ये सन 2013-14 या कालावधीमध्ये अत्यल्प पर्जन्यमानामुळे टंचाई ग्रस्त परिस्थिती निर्माण झाली आहे. सध्यास्थितीत जिल्हयात अपेक्षीत सरासरीच्या 54.22 टक्के पर्जन्यमान झाले आहे. दि. 01.11.2014 रोजी महाराष्ट्र भुजल अधिनियम 1993 च्या कलम 4 नुसार जिल्हयामध्ये ऑक्टोबर 2014 ते जून 2015 या कालावधित 10 तालूक्यातील 535 गावात वरिष्ठ भु-वैज्ञानिक भु.स.वि.य लातूर यांच्या अहवालानुसार टंचाईग्रस्त क्षेत्रामध्ये पाणी टंचाई जाहीर केली आहे. अत्यल्प पर्जन्यमानामुळे खरीप पिकांची हंगामी सुधारीत पैसेवारी 50 पैशापेक्षा कमी झाली आहे. त्यानुसार शासनाने दि 25.11.2014 चे आदेशानुसार टंचाई ग्रस्त म्हणुन 943 गावे जाहीर केली आहेत. सदर गावामध्ये शासनाने पुढील सवलती जाहीर केल्या आहेत. त्यानुसार खालील प्रमाणे उपाययोजना करणेबाबत आदेशीत करण्यात येत आहेत.

- जमीन महसुलात सुट
- सहकारी कर्जाचे रुपांतर
- शेतीशी निगडीत कर्जाच्या वसुलीस स्थगीती
- विज बिलात 33.5 टक्के इतकी सवलत
- परीक्षा शुल्कात माफी
- रोहयो अंतर्गत कामाच्या निकषांत काही प्रमाणात शिथीलता
- आवश्यक तेथे पिण्याच्या पाणी पुरविण्यासाठी टॅंकर्सचा वापर
- टंचाई जाहीर केलेल्या गावात शेतक-याच्या शेतीच्या पंपाची विज जोडणे खंडीत न करणे

लातूर जिल्हयातील टंचाईग्रस्त परिस्थिती हाताळणे, पिण्याच्या पाण्याचे नियोजन करणे, चारा टंचाई दुर करणे इ. कामे हाती घेणे आवश्यक आहेत.


दु.02382-243234,255204,255205,फॅक्स 02382-242330
संकेतस्थळ- www.latur .nic.in email id revenue.latur @ gmail.com rdc latur @gmail.com

जिल्हाधिकारी लातूर यांचे कार्यालय
महसुल शाखा

**1. टंचाई कक्ष स्थापन करणेः-**

तहसिल कार्यालय, पंचायत समीती कार्यालय, पशु संवर्धन कार्यालय तालूका स्तर, विज वितरण कंपनी तालूका स्तर, विज वितरण कंपनी तालूका स्तर, शिक्षण विभाग, सहकार व पणन विभाग तालूका स्तरावर टंचाई कक्ष निर्माण करावेत. या सर्व कक्षाचे प्रमुख यांची बैठक तहसिलदार यांनी घ्यावी. ही बैठक दर सोमवारी घेण्यात यावी. बैठकीस टंचाई संबंधीत सर्व विभाग जसे महसुल, रोहयो, पाणी टंचाई अभियंता, गटविकास अधिकारी, गट शिक्षण अधिकारी, सहायक निबंधक सहकारी संस्था, विज वितरण कंपनीचे तालूका स्तरावरील अधिकारी, पशु संवर्धन विभागांचे तालूका स्तरीय अधिकारी यांनी व्यक्तीशः उपस्थित राहणे बंधनकारक आहे. त्यांनी त्याच्या विभागांच्या संपुर्ण माहीतीसह योणे आवश्यक आहे. तसेच टंचाई कक्षास निवेदन प्राप्त झाल्यास त्याची स्वतंत्र नोंदवही ठेवुन त्यात नोंद घेण्यात यावी. तक्रारीच्या अनुषंगाने संबंधीत विभागाकडून तात्काळ पाहणी करून घेवुन कार्यवाही करावी. टंचाई संदर्भात लोकप्रतिनिधी यांचेशी चर्चा करुन त्यांच्याकडुन प्राप्त होणारे निवेदने, प्रस्ताव यांच्यावर प्राधान्याने कार्यवाही करावी. टंचाई / दुष्काळ संदर्भात विविध वृत्तमान पत्र व मिडीया संदर्भात प्रसिध्द होणा-या बातम्या यांचे कातरण हस्तगत करुन संबंधीत विभागाने तात्काळ कार्यवाही करावी.

**2.** शासनाने जाहीर केलेल्या सवलतीची अंमलबजावणी करण्यासाठी संबंधीत विभागप्रमुख उदा. पशुसंवर्धन, जिल्हा निबंधक सहकारी संस्था, जिल्हा परिषद, मग्रारोहयो, शिक्षण विभाग यांनी समन्वयाने तालूकास्तरावर कक्षाची स्थापना करून अंमलबजावणी करण्यात यावी.

**3. <u>टंचाईग्रस्त भागामध्ये पाणी टंचाई कक्षाची स्थापना करणे.</u> (हेल्प लाईन क्र. 1077 आपत्ती निवारण कक्ष)** जिल्हयात अत्यल्प पर्जन्यमान झाले असल्यामुळे जिल्हयातील मोठे, मध्यम व लघुप्रकल्पामध्ये 12 टक्के उपलब्ध पाणी साठा आहे. सदरचा पाणीसाठा पिण्यासाठी आग्रहक्काने राखुन ठेवणेबाबत या कार्यालयाकडुन दि. 07.11.2011 रोजी पाणी आरक्षण आदेश निर्गमीत करण्यात आलेले आहेत. माहे जानेवारी ते जुन-जुलै या कालावधीत टंचाईची तीव्रता अधिक असते. त्यामुळे पाणी / चारा टंचाईचे सनियंत्रण करण्याकरीता सर्व जिल्हा विभागांनी व तालुका स्तरावर टंचाई कक्षाची (ग्रामीण / नागरी) स्थापना करण्याचे निर्देश संदर्भ क्र 2 नुसार दिले आहेत. त्यानुसार टंचाई कक्षाची स्थपना करुन कक्षातील सदस्यांची नावे व त्यांचे दुरध्वणी/ मोबाईल क्र या कार्यालयास व उपविभागीय अधिकारी यांना कळवावे. तालुक्यातील गावनिहाय उपअभियंता यांची नेमणूक करुन त्यांना त्या गावातील पाणी टंचाईबाबत सर्वेक्षण करुन आवश्यक उपाययोजनाबाबत निर्देश दयावेत. जनतेच्या अडचणी किंवा तक्रारी नियंत्रण कक्षास प्राप्त झाल्यास त्वरीत संबंधीत तालूकास्तरीय नियंत्रण कक्षाशी संपर्क साधण्यात येऊन आडचणीचे निराकरण करण्यात यावे. टंचाईच्या दृष्टीकोणातून करण्यात येणा-या उपाययोजना फेब्रुवारी अखेर पर्यंत पुर्ण करुन त्या योजनांचा लाभ जनतेला होईल या दृष्टीने कार्यवाही करण्यात यावी. तसेच ज्या भागामध्ये टँकर लावण्यात येणार आहेत त्या भागात क्षेत्रीय स्तरावर टँकरच्या फे-या, टँकरचे वेळापत्रक यांची प्रसिध्दी देण्यात यावी. तालूका स्तरावर संबंधीतांनी टँकर ट्रॅकींग मॉनिटरींग सिस्टीम राबवावी व टँकरवर जिपीएस बसविण्यात यावे.

टंचाई संदर्भात करण्यात येणा-या सर्व उपययोजना बाबतची अवश्यक ती सर्व माहीती जिल्हयाच्या सांकेतीक स्थळावर (latur.nic.in) प्रदर्शीत करण्यात यावी. सदरची माहीती दर आठवडयास अद्दयावत करण्यात यावी. टँकरने पाणी पुरवठा होणा-या गावात एसएमएस व्दारे सुचना देण्यात याव्यात.



दु.02382-243234,255204,255205,फॅक्स 02382-242330
संकेतस्थळ- www.latur .nic.in email id revenue.latur @ gmail.com rdc latur @gmail.com

**4. शहरी भागातील पाणीटंचाईबाबत**

नागरी भागातील पाणीटंचाई संदर्भात प्रकल्प अधिकारी नगर पालिकाप्रशासन विभाग जि.का. लातूर यांनी जिल्हा स्तरावर टंचाई कक्षाची स्थपना करून महानगर पालिका व नगर पलिका स्तरावर टंवाई कक्षाची स्थापना करण्याबाबत निर्देश दयावेत तसेच प्राप्त प्रस्ताव मंजूरीस्तव वरीष्ठ कार्यालयास तात्काळ सादर करावीत व नागरी भागाच्या टंचाई कक्षावर नियंत्रण ठेवावे.

**5. चारा टंचाईबाबत**

पशुसंवर्धन विभागाने महसुल व वन विभाग यांचे शासन निर्णय दि. 22.07.2008 नुसार समीती स्थापन करावी. संपर्क अधिकारी यांची तालूकानिहाय नियुक्तीचे आदेश निर्गमीत करावेत. तसंच तालूक्यातील गावंची विभागणी करावी त्यासाठी मंडळ स्तरावरील अधिका-यांची नियुक्ती करावी मंडळ निहाय चाराटंचाईचा आराखडा तयार करावा तालूक्यात उपलब्ध असलेला चारा व किती चारा अवश्यक आहे. चारा कोठुन आणता येईल याबाबत सविस्तर सुक्ष्म नियोजन करून आराखडा तयार करावा. तालूक्यात चा-या अभावी पशुधनाची विक्री होणार नाहीत याबाबत दक्षाता घेण्यात यावी. मंडळ निहाय अधिकारी / कर्मचारी यांची नियुक्ती करून दर सोमवारी तहसिलदार यांचेकडे चारा टंचाई बाबतचा अहवाल सादर करावा. तहसिलदार यांनी दर सोमवारी टंचाईबाबतच्या सर्व टंचाईकक्ष प्रमुखांची बैठक घेवुन आढावा घ्यावा व टंचाई निवारणाची कार्यवाही करावी.

**6. विज बिलात सवलत 33.5 टक्के सवलत व शेतक-याच्या शेतीच्या पंपाची विज जोडणी खंडीत न करणे**

महाराष्ट्र राज्य विद्दुत वितरण कंपणी म. यांनी संपर्क अधिकारी यांची तालूकानिहाय नियुक्तीचे आदेश निर्गमीत करावेत. तसेच तालूक्यातील गावांची विभागणी करावी त्यासाठी मंडळ स्तरावरील अधिका-यांची नियुक्ती करावी मंडळ निहाय विज बिलात सवलत 33.5 टक्के सवलत देणेबाबत शेतकरी यांच्या यादया तयार कराव्यात. कोणतेही शेतकरी यांचे कृषी वापराचे विज पंपाचे / पाणीपुरवठा योजनेचे कनेक्शन तोडण्यात येणार नाहीत याची दक्षता घ्यावी. मंडळ निहाय अधिकारी / कर्मचारी यांची नियुक्ती करून दर सोमवारी तहसिलदार यांचेकडे विज बिलाच्या सवलतीबाबत अहवाल सादर करावा.

**7. परीक्षा शुल्कात माफी**

शिक्षण विभागामार्फत संपर्क अधिकारी म्हणुन तालूकानिहाय गट शिक्षण अधिका-यांचे नियुक्तीचे आदेश निर्गमीत करावेत तसेच तालूक्यातील गावंची विभागणी करावी त्यासाठी मंडळ स्तरावरील केंद्र प्रमुख यांची नियुक्ती करावी केंद्र निहाय परीक्षा शुल्कात माफी देणेबाबत विद्दयार्थी यांच्या शाळानिहाय यादया तयार कराव्यात. कोणताही विद्दयार्थी शासनाच्या सवलतीपासुन वंचीत राहणार नाही याची दक्षता घ्यावी. दर सोमवारी तहसिलदार यांचेकडे परीक्षा शुल्कात माफी सवलतीबाबतचा अहवाल सादर करावा.

**8. सहकारी कर्जाचे रुपांतर व शेतीशी निगडीत कर्जाच्या वसुलीस स्थगीती**

सहकार विभागामार्फत संपर्क अधिकारी म्हणुन तालूकानिहाय सहायक निबंधक अधिका-यांचे नियुक्तीचे आदेश निर्गमीत करावेत. तसेच तालूक्यातील गावांची विभागणी करावी त्यासाठी मंडळ स्तरावरील वसुली अधिकारी यांची नियुक्ती करावी सहकारी कर्जाचे रुपांतर व शेतीशी निगडीत कर्जाच्या वसुलीस स्थगीतीबाबत शेतक-याच्या सहकारी संस्था निहाय यादया तयार कराव्यात कोणताही शेतकरी शासनाच्या सवलतीपासुन वंचीत राहणार नाही याची दक्षता घ्यावी. दर सोमवारी तहसिलदार यांचेकडे सवलतीबाबतचा अहवाल सादर करावा.


दु.02382-243234,255204,255205,फॅक्स 02382-242330
संकेतस्थळ- www.latur .nic.in email id revenue.latur @ gmail.com rdc latur @gmail.com

**9. <u>रोहयो अंतर्गत कामाच्या निकषांत काही प्रमाणात शिथीलता (कृषी, जलसंधारण, वनिकरण, सार्वजनिक बांधकाम विभाग)</u>**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत मजूराचे मागणी प्रमाणे काम उपलब्ध करून दयावे सेल्फवर कामे उपलब्ध करुन देताना कामाच्या निकशामध्ये काही प्रमाणात शिथिलता दयावी. मग्रारोहयो कामाकरीता संपर्क अधिकारी म्हणुन तालूकानिहाय अधिका-यांचे नियुक्तीचे आदेश निर्गमीत करावेत. तसेच तालूक्यातील गावांची विभागणी करावी त्यासाठी मंडळ स्तरावरील अधिकारी यांची नियुक्ती करावी कोणताही नोंदणीकृत मजूर शासनाच्या सवलतीपासुन वंचीत राहणार नाहीत याची दक्षता घ्यावी. तालूक्यात नविन कोणती कामे सुरु करता येतील याबाबत सर्वेक्षण करण्यात यावे. सदरील विभागामार्फत वेळोवेळी टंचाई सदृष्य कालावधीत विविध कामे हाती घेण्यात यावीत. दर सोमवारी तहसिलदार यांचेकडे अहवाल सादर करावा.

तहसिलदार यांनी दर सोमवारी तालूका स्तरावरील टंचाई संबंधीत सर्व संपर्क अधिकारी यांची सविस्तर बैठक घेवुन इतिवृतांताची प्रत rdclatur@gmail.com व revenue.latur@gmail.com या ई-मेल आयडीवर सादर करावे.

**10. <u>टंचाई कालावधीत सर्व विभागांच्या समन्वयासाठी यंत्रणा जिल्हा प्रशासनाच्या अधिपत्याखाली आणने</u>.**

शासन परिपत्राक दि 03.04.2013 मधील मार्गदर्शक सुचनेनुसार टंचाई कालावधीत टंचाई निवारणाची संपुर्ण जबाबदारी जिल्हा प्रशासनावर असल्याने सदर घेण्यात येणा-या विविध उपययोजनांची अंमलबजावणी करताना अनेक क्षेत्रिय कार्यालयाशी संपर्क साधून समन्वय साधावा लागतो. त्याकरीता टंचाई कालाधीमध्ये जिल्हा / तालूका स्तरावरील पाणीपुरवठा व अत्यावश्यक असलेल्या सर्व यंत्रणेतील अधिकारी/कर्मचारी यांच्यावरील प्रशासकीय नियंत्रण जिल्हाधिकारी यांचे राहील. टंचाई कालावधीत अधिकारी यांनी जिल्हाधिकारी यांचेकडुन रजा मंजूर करुन घेणे बंधनकारक आहे. कोणतेही अधिकार/कर्मचारी यांनी गैरहजर राहणे हे शिस्तभंग होतो.

तरी टंचाई कालावधीत सर्व क्षेत्रिय यंत्रणेतील अधिकारी/कर्मचारी यांना मुख्यालय सोडणे, रजा घेणे पासून शिस्तभंगाची कार्यवाही करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना राहतील.

सदर परीपत्रकाची अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी.

**स्वाक्षरीत/-**
**जिल्हाधिकारी, लातूर**

1. मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

प्रत माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव.

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. लातूर
2. पोलिस अधिक्षक, लातूर
3. उपायुक्त, पशुसंवर्धन विभाग, लातूर
4. अधिक्षक अभियंता, म.रा.वि.वि..क. म. लातूर
5. अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, लातूर
6. आयुक्त, महानगरपालिका, लातूर


दु.02382-243234,255204,255205,फॅक्स 02382-242330
संकेतस्थळ- www.latur .nic.in email id revenue.latur @ gmail.com rdc latur @gmail.com

7. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, लातूर
8. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जि.प.लातूर
9. जिल्हा दुग्ध विकास अधिकारी लातूर
10. जिल्हा रेशीम अधिकारी, लातूर
11. जिल्हा आरोग्य अधिकारी, लातूर
12. जिल्हा शल्य चिकीत्सक लातूर
13. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था लातूर
14. जिल्हा नियोजन अधिकारी, जि.का.लातूर
15. जिल्हा माहिती अधिकारी, लातूर
16. व्यवस्थापक जिल्हा अग्रणी,बँक लातूर
17. उपसंचालक शिक्षण विभाग गांधी चौक लातूर
18. उपसंचालक सामाजीक वनकिरण लातूर
19. वरिष्ठ भुवैज्ञानिक, भुजल सर्वेक्षण विभाग, लातूर
20. कार्यकारी अभियंता, लातूर पाटबंधारे विभाग, लातूर
21. कार्यकारी अभियंता, लातूर मध्यम प्रकल्प, लातूर
22. कार्यकारी अभियंता, ल.पा.स्थानिक स्तर लातूर
23. कार्यकारी अभियंता, लातूर लघु पाटबंधारे विभाग लातूर
24. कार्यकारी अभियंता, निम्न तेरणा कालवा विभाग क्रं.२, लातूर
25. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, जलव्यवस्थापन विभाग,लातूर
26. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, लातूर
27. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग लातूर/ निलंगा
28. उपविभागीय अधिकारी, लातूर /उदगीर /निलंगा/औसा- रेणापूर/ अहमदपूर-.
29. शिक्षण अधिकारी प्राथमीक/माध्यमीक विभाग लातूर
30. कार्यकारी अभियंता,(पाणी पुरवठा विभाग) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, लातूर
31. सर्व तहसिलदार / गट विकास अधिकारी, जिल्हा लातूर
    a. लातूर/ औसा/ रेणापुर/ अहमदपूर/ चाकूर/ उदगीर/ जळकोट/ निलंगा/ देवणी/ शि. अनंतपाळ
32. मुख्याधिकारी, नगरपरिषद निलंगा / औसा / अहमदपूर / उदगीर.
33. सर्व शाखा प्रमुख ---------------------- जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर

**स्वाक्षरीत/-**

**जिल्हाधिकारी लातूर करीता**


दु.02382-243234,255204,255205,फॅक्स 02382-242330
संकेतस्थळ- www.latur .nic.in email id revenue.latur @ gmail.com rdc latur @gmail.com